केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत असंसर्गजन्य आजार (NCD) कार्यक्रमांसाठी आदिवासी योजनेअंतर्गत (TSP) सन २०१७-१८मध्ये प्राप्त झालेल्या केंद्र हिश्श्याचा रू.४५८.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमएचएम-२०१७/प्र.क्र.५९१/आ-७
१० वा मजला , गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
तारीख: ०५ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा</u>

१) **केंद्र शासनाचे पत्र क्र.NO.G.२५०१२/५/२००९-NRHM Finance,दिनांक १०/०२/२०१४**
२) **शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दिनांक १८/०४/२०१७**
३) **केंद्र शासनाचे आदेश क्र.G.२७०३४/३८/२०१७-NHM-F/३-४,दिनांक ०४ डिसेंबर,२०१७**
४) **संचालक,वित्त व लेखा,राष्ट्रीय आरोग्य अभियान,महाराष्ट्र मुंबई यांचे पत्र क्र.राआसोम/एफएमजी/कें.रा.हि/७२४३५-४४५/२०१७-१८,दिनांक ८/१२/२०१७**
५) **शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग,क्र.बीयुडी-२०१७/प्र.क्र.५/कार्या-०६,दिनांक १७/०१/२०१८**

<u>प्रस्तावना</u>

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या केंद्रपुरस्कृत योजनांसाठी केंद्र शासनाने उपरोक्त आदेशान्वये असंसर्गजन्य आजारांशी संबंधित योजनांसाठी (NCD)। ६०% केंद्र हिश्श्यापोटी आदिवासी उपयोजनेअंतर्गत (TSP)सन २०१७-१८ मध्ये रु.४५८.०० लक्ष इतका निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला आहे.सदर निधी आदिवासी विकास विभागाने त्यांच्या संदर्भ क्र.५ च्या शासन निर्णयान्वये अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरणासाठी उपलब्ध करून दिला आहे.सदर निधी राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता . याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय-

राज्यामध्ये राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (NCD)या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत आदिवासी उपयोजने अंतर्गत (TSP) लाभार्थ्यांकरिता सन २०१७-१८ साठी ६०% केंद्र हिश्श्यापोटी प्राप्त झालेला रु.४५८.०० लक्ष (रुपये चार कोटी अठ्ठावन्न लाख फक्त) इतका निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक

कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सहसंचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, पुणे यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्र.टी-५, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य; ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना अंतर्गत खालीलप्रमाणे नमूद केलेल्या योजना निहाय लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-१८ साठी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

अ.क्र.	योजना	लेखाशिर्ष	वितरित निधी (रु.लाखात)
१	NPCB	(०१) (२३) राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्राचा हिस्सा ६० टक्के) २२१०F७९२ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	१८०.३३
२	NPCDCS	(०१) (२९) राष्ट्रीय कर्करोग, मधुमेह, हृदयरोग व पक्षघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्राचा हिस्सा ६० टक्के) २२१०F८५४ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	१८०.५६
३	NTCP	(०१) (२७) राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्राचा हिस्सा ६० टक्के) २२१०F८३६ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	५१.८२
४	NPHCE	(०१) (२५) राष्ट्रीय वृद्धापकाळ आरोग्य शुश्रुर्षा कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्राचा हिस्सा ६० टक्के) २२१०F८१८ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२३.२६
५	NMHP	(०१) (२४) राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्राचा हिस्सा ६० टक्के) २२१०F८०९ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२२.०३
			४५८.००

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्राकरीता (TSP)उपलब्ध करून दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्याकरीता व आदिवासी क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी.तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर (OTSP) केलेली तरतुद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरीताच खर्च करण्यात यावी.

५. वित्त विभागाच्या क्र.अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३,दिनांक १८ एप्रिल,२०१७ च्या परिच्छेद ७ ते १८ व त्यासोबतच्या परिच्छेदामधील अनु.क्र.८ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये लेखापरिक्षक/महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप घेण्यात आलेले नाहीत.सदर प्रस्तावातील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर कार्यक्रमांच्या संबंधीत लेखाशिर्षाखाली एक वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.शासनाच्या धोरणानूसार सदर प्रस्तावातील निधी राज्य आरोग्य सोसायटीच्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करून खर्च करण्यात येणार आहे,असे प्रमाणित करण्यात येत आहे.

६. वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/प्र.क्र.८५/२०१३/अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

७. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय,उद्योग,उर्जा व कामगार विभाग,दिनांक १ डिसेंबर,२०१६मधील तरतुदीनूसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

८. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने तसेच त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४९५/अर्थोपाय, दिनांक १९/१२/२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०५११४४५३२४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amol Nilakanth Sakharkar

Digitally signed by Amol Nilakanth Sakharkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture Animal Husbandry dairy and Fisheries Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=36b60751d094e56d974e1a44ec234c475fb0de5b35a79c1cf69a588f212b260e, serialNumber=bb4888cebbf4b7a6440c6531a52925e3c8140b1c28df723d8f006d11bc169a08, cn=Amol Nilakanth Sakharkar
Date: 2018.02.05 16:09:04 +05'30'

(अ.नि.साखरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४. अति. संचालक, कु.क. कार्यालय, पूणे
५. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
६. सहायक संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
७. प्रशासकीय अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१२.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
१३.निवडनस्ती (आरोग्य -७) .